# शिवगड !



फोंडा घाटातून फार प्राचीन काळापासून समुद्रमार्गे येणाऱ्या सैन्याची व व्यापारी मालाची वाहतुक होत असे. कोंकणातील विजयदुर्ग, देवगड बंदरांतून देशावरील समुद्ध बाजारपेठांमधून मालाची मोठ्या प्रमाणात आयात-निर्यात होत असे. त्यामुळे फोंडा घाटात या व्यापारी मार्गावर जकात आकारली जायची. इ.स. १८२१ मधील एका पत्रातून या जकात नाक्याविषयीचा महत्त्वपूर्ण असा उल्लेख आपणास मिळतो. :-

पो छ ५ माहे रजब — फाल्गुन वद्य ९ शके १७४२,
सन इहिदे अशरीन मयातैन व अलफ — तारीख २८ मार्च १८२१

"चिरंजीव समरत्त राजकार्य धुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री मोरेश्वरराव पंडित आमात्य यासी आज्ञा केली यैसी जे जकायेत मार्ग फोंडा येथे जकायेतीच हासिलाकरिता मेढे घालून मार्गास, रहदारीस आडथला चौक्या ठेऊन केला आहे म्हणोन हुजूर निवेदनात आले. येविसीचे मजकुराचे पेसजी आज्ञापत्र सादर जाहाले आहे. त्यास आपणाकडील काय बोलणे जकायेतीच हासिलाविसीचे आसल ते हुजूर निवेदन करावे. तो पर्यंत चौक्या व मेढे घातले आहेत ते उठऊन नहणेची आज्ञा होऊन हुजुरुन सेदोजी गाइकवाड व आबा पाडलकर हुजुरे पाठविले आहेत. याचे विदमाने चौक्या, लोक उठऊन न्याहवे आणि आपण मार्गास जकायेतीविसी आडथला न करिता मार्ग चालू द्यावे. येविसी फिरोन बोभाट हुजूर येऊ न देणे. जाणिजे. सुा इहिदे आसरीन मयातैन व आलफ. रा छ २३ माहे जमादिलाखर. बहुत लिहिणे तरी सूज्ञ आसा. विलसति लेखनावधि."

या फोंडाघाट-मार्गाच्या सुरक्षिततेकरीता, संरक्षणाकरता दाजीपुरच्या डोंगरात मोक्याच्या ठिकाणी उभारलेला एक गिरीदुर्ग ... किल्ले शिवगड ! इ.स. १७३० च्या सुमारास करवीरकरांनी सरदार उदाजीराव मोहितेच्या नेतृत्वाखाली सावंतवाडी संस्थानाच्या मुलुखावर स्वारी केली. या मोहिमेत त्यांस फार यश लाभले नाही. या सुमारास सावंतवाडी गादीवर फोंड सावंत उर्फ आनासाहेब होते. त्यांनी राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही जुन्या किल्ल्यांची दुरुस्ती केली तर काही नवीन किल्ले उभारले. करवीर छत्रपतींच्या कोंकणात होणाऱ्या स्वाऱ्या घाटावरच रोखता याव्यात व कोंकणात बिनविरोध राज्य करता यावे या हेतूने इ.स. १७३२ च्या जून महिन्यात फोंड सावंताने फोंडा घाटावर आपले नियंत्रण-वचक ठेवता येईल या दृष्टीने बोलवण-घोणसरीच्या डोंगरावर आपले सैन्य पाठविले. वस्तुतः सावंताची ही लष्करी हालचाल त्यावेळी एकप्रकारे कोल्हापूर राज्याच्या प्रदेशात घुसण्यासारखीच होती. ही बातमी करवीरकर भंगवतराव पंत अमात्यांस कळताच त्यांनी जलद हालचाल करुन सावंतांचे सैन्य यास्थळी येऊन पोहोचण्यापूर्वीच बोलवण-घोणसरीच्या डोंगरावर पूर्ण ताबा मिळविला व करवीरकर छत्रपतींकडे अधिक फौज पाठविण्यासाठी पत्र लिहिले. करवीरकर छत्रपतींनी या पत्राप्रमाणे रांगणागड व भूधरगडावरील सैन्य बाळाजी देसाई व सरवडे या सरदारांच्या नेतृत्वाखाली त्वरीत पाठविले. सावंतवाडीच्या सैन्यास डोंगर पायथ्यास घोणसरीतच रोखले.

या घटना-प्रसंगात करवीरकर छत्रपती संभाजी राजांनी भंगवंतराव पंत अमात्यांना पाठविलेल्या एका पत्रातील मजकूर असा -"तुम्ही जमाव पाठवून डोंगर धरिला. उत्तम गोष्ट केली. सावंताचा जमाव नजीक आहे यास्तव डोंगर मजबुतीने राखावा लागतो. त्यास येथे लोक पाठविले आहेत. त्यांची बेगमी करुन त्याणी आणविलेप्रमाणे सामान पाठविले. रांगणा, भूधरगड वगैरे ठिकाणचा जमाव बाळाजी देसाई व सरवडे आदीकरुन सरदाराबरोबर गावोगावचा जमाव पत्रे पाठवून रवाना करविला". पंत अमात्यांची चढाई यशस्वी झाली. त्यामुळे फोंड सावंताना डोंगर (किल्ला) मिळविण्याचा प्रयत्न सोडून परत जावे लागले. किल्ला पायथ्यास घोणसरीत झालेल्या या हातघाईत करवीरकरांच्या सैन्यातील विश्राम सावंत ठार झाला. त्याच्या मुलास पुढे करवीर राज्यातून सनद लावून दिली गेली. त्यातील वृत्तांत असा-

श्री रामचंद्र

श्रावण शुद्ध १५ शके १७३३
तारीख ४ ऑगस्ट १८११)

श्री सीताराम चरण रामचंद्र नीळकंठ शरण. आज्ञापत्र राजश्री पंत अमात्य ताा मिरासी गावकर ताा सालसी. सुा इसने आशर मयातैन व अलफ रा सिवराम सावत भोसले तरदलेकर याचे बाप विश्राम सावत सरकार कामावर घोणसरीचे मुकामी

गट नंबर 1592 - शिवगड नोंद पाहणे व कागदामध्ये.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

युद्धसमई लढाईत ठार जाहाले. सा सावत मार याजवरी कृपालू होऊन माराकडे पेशजी नेमणूक करुन देऊन सनद सादर आहे. त्याप्रमाणें सदरहू नेमणुकेचा यैवज साल मजकूरपासोन नेमून दिल्हा असे. बिा गाव

| | नकद रुा | गला कैली बारुले मापे |
|---|---|---|
| मौजे तरदेल | १० | ।। |
| मौजे वाघेरी | १० | ।। |
| २० | १ | |

येकून रुा वीस गला येक खंडी करार करुन देऊन हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी सदरहू नेमणुकेप्रमाणे गला नक्त सावत मार याजकडे पावते करुन जिल्हे मारचे यैवजी साल दरसाल मजरा घेत जाणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन आसल पत्र सावत मार याजकडे परतोन देणे. जाणिजे. छ १४ माहे रजब. निदेश समक्ष. लेखनावधी मुद्रा....".

अशाच प्रकारच्या अजून तीन सनदा मला पाहावयास मिळाल्या. किल्ले शिवगडाच्या तनख्यातून व पायथ्यास वसलेल्या कुर्ली, घोणसरी गावांच्या जमिनींतून काही जमीन त्या-त्या सनद पत्रास इनाम लावून दिलेली आहे. करवीर सैन्यातील बाबूराव विश्राम वाईगणकर, बहिरोल-बेदर (टकले) या दोघांस सरकारी चाकरीबद्दल आणि कुर्ली गावातील श्रीदेव पांडुरंग संस्थानास (रामपेठ) देवाच्या पूजा, दीप, नैवेद्याकरीता .... या सनद पत्रांतून नेमणूक करुन दिलीय. खरे तर बोलवण-घोणसरीचा हा डोंगर हा केवळ डोंगर नाही तर तो शिवगड किल्ला आहे. त्यावर अद्यापही तटबंदी, बुरुज, प्रवेशद्वारांचे अवशेष आहेत. आजमितीसही हे पडके अवशेष, तत्कालीन वाडे-इमारतींची जोती, बालेकिल्ला या सर्वांच्या स्पष्ट खुणा किल्ल्यात आहेत. थोडक्यात वाडीकर फोंड सावंतांचे सैन्य किल्ला उभारण्यास नव्हे तर मूळ असलेल्या किल्ल्याची डागडुजी करुन तो आपल्या कब्जात घेण्यासाठीच आले होते. त्यास करवीरकरांनी प्रतिबंध केला. त्यामुळे निश्चितपणे या किल्ल्याची उभारणी किल्ल्याचे मोक्याचे स्थान पाहाता जवळच्याच गगनगड व रांगणागडाप्रमाणे फार पूर्वीची असावी या बाबत काही शंका उरत नाही. मात्र ती उभारणी कोणी? कोणत्या साली केली? याविषयी ठोस लिखित पुरावे सापडत नाहीत. या शिवगड परिसरातील किल्ले रांगणा, सामानगड, भूधरगड, गगनगड आदी सोळा किल्ल्यांच्या उभारणीचे श्रेय शिलाहार राजा भोज (दुसरा) याच्याकडे जाते. त्याचप्रमाणे कोंकण किनारी शास्त्री नदीच्या मुखाशी असलेला जयगड, वाघोटन नदीच्या मुखाशी घेरिया उर्फ विजयदुर्ग तर अगदी उत्तर कोंकणातील अशेरीगड या किल्ल्यांची निर्मिती शिलाहार काळातच झाली. पन्हाळा उर्फ पनाल दुर्गावर शिलाहारांची राजधानी होती. यादरुन या शिवगडाची निर्मिती याच काळातील असावी, असे खात्रीदायक वाटते.



'शिवगड' हा सिंधुदुर्ग व कोल्हापूर जिल्ह्याच्या अगदी सीमेवर आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे २८०० फूट उंचीवरील हा किल्ला महाराष्ट्राचे पहिले अभयारण्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दाजीपूरच्या जंगलात आहे. त्यामुळे दाजीपुरातील या किल्ल्यावर यावयाचे असल्यास आपणास वनखात्याची परवानगी व मार्गदर्शन घेऊनच यावे लागते. अन्यथा शिवगड तसा सापडणे कठीण. मुख्य तपासणी नाक्यावरुन साधारण वीस मिनिटांच्या चालीनंतर वन खात्याच्या दुसऱ्या गेटपाशी असलेल्या एका इमारतीजवळ आपण पोहोचतो. या इमारतीच्या डाव्या बाजूला मळलेल्या पाऊल वाटेवरुनच पुढे-पुढे व्हायचे व तेथून साद-कुकाऱ्या घालायच्या. इथे सहज दृष्टीस न पडणारा धनगराचा वाडा आहे. आवाज ऐकताच लहान-सहान मुले किंवा कोणीतरी इसम पुढे येतो. या वाड्यापासून अवघ्या पंधरा मिनिटांवरच हा किल्ला आहे. शिवगड हा मुख्य सह्याद्री धारेपासून वेगळा असून त्याची उंची या सह्यधारेच्या पठाराएवढीच असल्याने किल्ला म्हणून ओळखणे वा सापडणे तसे कठीण आहे. म्हणूनच या धनगरवाड्यातून कुणाही मुलास विनंती करुन त्यास घेऊनच किल्ल्यापर्यंत यावे लागते.

दाजीपूरचे अभयारण्य खास गव्यासाठी प्रसिद्ध असून या अभयारण्यात बिबटे, सांबर, कोल्हे, डुक्कर, मोर, गरुड यांचाही चांगल्या संख्येने वावर आहे. राधानगरीचा प्रचंड जलाशय, शिवाय आंबोली घाटाप्रमाणेच किंबहुना त्याहूनही निसर्गाचा जास्त एकांत-आनंद निसर्गप्रेमींस इथे जाणवेल असे निसर्गरम्य वातावरण, थंडगार हवामान सदैव असते. याचे मुख्यत्वे कारण येथे बाजारपेठ व वाहन वर्दळ नसल्यामुळे मनुष्य गर्दी फार नाही. मात्र पर्यटकांची अपेक्षा पूर्ण करेल असे येथे एक बायसन जंगल रिसॉर्ट आहे. या येथे निसर्गाच्या प्रसन्न वातावरणाशी समरस होणारे तंबू निवासही आहेत.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner